# Institutional Distinctiveness

**Two Word Project :-**

Every year after admission of student teacher in our college ***Two word*** project on different subject ( like economical, educational thinkers, political , autobiography of scientist ,freedom fighters, ) is given to them. Teacher student create two word project in their own handwriting.

On the last day of the week, the in first lecturer teacher students express their thoughts on various subjects in two word project.

**Outcomes-**

1. This Two Word Project develop students knowledge.
2. Get scope to comment on favorite topics.
3. A platform is available for speaking
5. Helps in personality development
6. Avilable Student handbooks for the library

P.S.G.V.P.Mandal's SHAHADA Dist.Nandurbar College of Education

PRINCIPAL
P.S.G.V.P.Mandal's
College of Education
SHAHADA Dist.Nandurbar

विद्यार्थ्यांचे नांव अहिरे सुनिता वेडु रोल नं. 02

# * पसायदान *

**प्रस्तावना** :- १२९० मध्ये ज्ञानेश्वरी (भावार्थ दिपीका) आणि 'अमृतानुभव' हे संत ज्ञानेश्वराचे महान ग्रंथ होय. महाराष्ट्रातील समस्त शिरोधार्थ मानले गेले आहेत. ज्ञानेश्वरीतलाच एक भाग म्हणजे 'पसायदान' होय. बुद्धीची प्रतिभा, अंत:करणातील तळमळ आणि वाणीचा प्रसाद हे संत ज्ञानेश्वरांचे गुण ज्ञानेश्वरीत दिसुन येतात.

संत ज्ञानेश्वरांचा जन्म इ.स. १२७५ मध्ये आपेगाव पैठण येथे झाला होता आणि त्यांनी १२९६ मध्ये आळंदी येथे समाधी घेतली. त्यांचे पुर्ण नाव 'ज्ञानेश्वर विठ्ठल पंत कुलकर्णी' असे होते. त्यांनी पसायदानात म्हटले आहे की,

* आता विश्वात्मके देवे । येणे वाग्यज्ञे तोषावे ।
* तोषोनि मज द्यावे । पसायदान हे ॥

आता सर्व विश्वाचा आत्मा जो परमेश्वर, त्याने या वाङ्मय यज्ञाने संतुष्ट होऊन मला पसायदान द्यावे.

* जे खळांची व्यंकटी सांडो । तया सत्कर्मी रती वाढो ।
* भुता परस्परे पडो । मैत्र जीवाचे ॥

दुष्टांची वाकडी नजर सरळ होवो आणि त्यांच्या अंत:करणास सत्कृत्याबद्दल प्रेम वाटीस लागो आणि सर्व भुमांमध्ये परस्पर जीवांचे मैत्री उत्पन्न होवो.

* दुरितांचे तिमिर जावो । विश्व स्वधर्म सुर्ये पाहो ।
* जो जे वांछील तो ते लाहो । प्राणिजात ॥

पापाचा अंधकार नष्ट होवो आणि आत्मज्ञानाचा प्रकाशाने सर्व विश्व उजळो, मग जो-जो प्राणी जे-जे इच्छिल ते-ते त्याला लाभो.

* वर्षत सकळ मंगळी । ईश्वरनिष्ठांची मांदियाळी ।
* अनवरत भुमंडळी । भेटतु भुतां ॥

आणि सर्व मांगल्याचा वर्षाव करणारे जे संतसज्जनांचे समुदाय त्यांची भेट या भु-तलावर सर्व भुतमात्राला अखंड होवो.

* चला कल्पतरूंचे आरव । चेतना चिंतामणीचे गांव ।
* बोलते जे अर्णव । पीयुषांचे ॥

हे संतसज्जन म्हणजे चालत्या कल्पवृक्षांचे अंकुर होत किंवा हे चैतन्यरुपी चिंतामणीरत्नांचे गाव अथवा अमृतचे बोलते सागर होत

* चंद्रमे जे अलांछन । मार्तंड जे तापहीन ।
* ते सर्वांही सदा सज्जन । सोयरे होतु ॥

कलंकहीन असा जो चंद्र किंवा तापहीन असा जो सुर्य तसे हे साधुसज्जन सर्वांचे सततचे सोयरे आहेत.

- किंबहुना सर्व सुखी । पुर्ण होऊनी तिन्ही लोकीं ।
- भजिजो आदिपुरुषी । अखंडीत ॥

सारांश, तिन्ही भुवने अद्वैत -सुखाने परिपुर्ण भरून आदि-पुरुषाच्या भजनाला अखंडपणे लागोत.

- आणि ग्रंथोपजीविये । विशेषी लोकी इथें ।
- दृष्टादृष्टविजये । होआवें जी ॥

आणि विशेषतः या लोकी ग्रंथावरच ज्यांचे अजीवन आहे त्यांना ऐहिक व पारलौकिक सुखांचा लाभ घडो.

- येथे म्हणे श्री विश्वेश्वराओ ।
- हा होईल दान पसावो ।
- येणे वरें ज्ञानदेवो । सुखीया जाला ॥

हे ऐकताच विश्वेश्वर प्रभु म्हणाले, हा प्रसाद तुला दिला आहे, या वरदानाने ज्ञानदेव फार सुखी झाला.

अशा प्रकारे संत ज्ञानेश्वरांनी ~~कक~~ पसायदानातुन जगाला मार्मिक अर्थ सांगितला आहे. परमात्म्याकडे ते सत्कर्माची विनवणी करतात. या पसायदानातुनच आपल्याला सार प्राप्त होतो.

॥ पसायदान ॥

आता विश्वात्मके देवे । येणे वाग्यज्ञे तोषावे ।
तोषोनि मज द्यावे । पसायदान हे ॥१॥
जे खळांची व्यंकटी सांडो । तया सत्कर्मी रती वाढो ।
भुता परस्परे जडो । मैत्र जीवांचे ॥२॥
दुरितांचे तिमीर जावो । विश्व स्वधर्म सुर्ये पाहो ।
जो जे वांच्छिल तो ते लाहो । प्राणिजात ॥३॥
वर्षत सकळ मंगळी । ईश्वरनिष्ठांची मांदियाळी ।
अनवरत भुमंडळी । भेटो तयां भुतां ॥४॥
चला कल्पतरुंचे आरव । चेतना चिंतामणीचे गाव ।
बोलते जे अर्णव । पीयुषांचे ॥५॥
चंद्रमे जे अलांछन । मार्तंड जे तापहीन ।
ते सर्वाही सदा सज्जन । सोयिरे होतु ॥६॥
किंबहुना सर्व सुखी । पुर्ण होऊनि तिन्ही लोकी ।
भजिजो आदिपुरुषी अखंडीत ॥७॥
आणि ग्रंथोपजीविये । विशेषी लोकी इये ।
दृष्टादृष्ट विजये । होवावे जी ॥८॥
येथे म्हणे श्री विश्वेश्वराओ ।
हा होईल दान पसावो ॥
येणे वरे श्री ज्ञानदेवो । सुखिया जाहला ॥९॥

# * सर्व शिक्षा अभियान *

'भारत हे महाशक्तीशाली राष्ट्र व्हावे' हे स्वप्न डॉ. ए. पी. जे. कलामांसोबत प्रत्येकाचे स्वप्न बनले आहे आणि ते साकार होणार हे निश्चित भारत एक विकसीत शक्तीशाली राष्ट्र म्हणुन उदयाला येत आहे या विकसीत राष्ट्राचा पाया हा सुशिक्षीत संस्करीत चारीत्र्य संपन्न आणि कर्तव्यनिष्ठ मनुष्य बळ हा आहे. मनुष्यबळ निर्माण करण्यासाठी प्रमुख जबाबदारी शिक्षणावर पर्यायाने शिक्षकांवर आहे.

शाळेसाठी सर्व आणि सर्वांसाठी शाळा हे या अभियानाचे वैशीष्ट्य आहे. शिक्षणापासुन कोणीच वंचीत राहू नये. भारतीय राज्य घटनेतील कलम ४५ नुसार ६ ते १४ वयोगटातील मुलांना मोफत व सक्तीचे शिक्षण देण्यासाठी घटनात्मक तरतुद केलेली आहे. त्यादृष्टीने प्राथमीक शिक्षणाच्या सार्वत्रिकीकरणासाठी आजपर्यंत शासनाने विविध योजना उपक्रम अंमलात आणले. परंतु काही उद्दिष्ट्ये साध्य होऊ शकले नाही म्हणुन केंद्रशासनाने 'सर्व शिक्षा अभियान' हा कालबध्द कार्यक्रम अंमलात आणला.

प्राथमिक शिक्षणाचे उद्दिष्ट निश्चित कालमर्यादेत पूर्णत: साध्य करण्यासाठी केंद्र आणि राज्य शासनाने संयुक्तपणे सर्व शिक्षा अभियान ही महत्त्वाकांक्षी योजना हाती घेतली. तसेच सर्व शिक्षा अभियान हा प्राथमीक शिक्षणाच्या सार्वत्रिकी करणासाठीचा एक कार्यक्रम आहे.

## व्याख्या :-

समाजाकडून होत असलेल्या दर्जेदार प्राथमीक शिक्षणाच्या मागणीला शासनाच्या प्रतीसाद म्हणजे सर्व शिक्षा अभियान होय. या अभियानात स्थानिक स्वराज्य संस्था राज्य आणि केंद्र सरकार यांची भागीदारी आहे.

प्रत्येक राज्याला त्यांच्या स्वत:च्या दृष्टीकोनातुन प्राथमीक शिक्षणाच्या विकास करण्यास संधी या अभियानातुन मिळते.

- प्राथमीक शिक्षणाच्या सार्वत्रिकीकरणासाठी कालबध्द कार्यक्रम करणे.
- संपूर्ण देशात गुणवत्ताधारीत शिक्षणाच्या मागणीला योग्य प्रतीसाद देणे.
- मुलभुत शिक्षणाद्वारे सामाजिक न्यायाची संधी देणे.

- पंचायतराज संस्था, शालेय व्यवस्थापन समिती, शिक्षण समीती, पालक, शिक्षक संघ, माता पालक शिक्षक संघ, आदिवासी संस्था व वस्ती पातळीवरील संस्थाना प्राथमीक शाळेच्या व्यवस्थापनात प्रभावीपणे सहभागी करून घेण्याचा प्रयत्न.

'एकही मुल शाळेपासुन वंचीत राहणार नाही' हे सर्व शिक्षा अभियानाचे ब्रिद आहे.

शाळेत दाखल झालेली सर्व मुले शाळेत टिकून ठेवले हे सर्व शिक्षा अभियानाचे उद्दिष्टे आहे. सर्व शिक्षा अभियान म्हणजे गावातील, पाड्यातील वस्त्यांच्या समाजाच्या सक्रीय सहभागाद्वारे प्राथमीक शिक्षणाचे सार्वत्रिकीकरण करण्यासाठी, सर्व मुलामुलींना दर्जेदार व गुणवत्तापुर्ण शिक्षणाची संधी देऊन त्यांच्या मधील मानवी क्षमतांचा विकास साधणारा नियोजनबद्ध कार्यक्रम आहे. हा कार्यक्रम गावातील शहर, वस्ती, झोपडी एवढेच नव्हे तर अगदी दीरभटीवरील मुलगा मुलगी शिक्षणाच्या प्रवाहात आणून त्या प्रत्येकाला जीवनातील व्यवसायामध्ये समर्थपणे उभे राहण्यासाठी गुणवत्ता पुर्ण शिक्षण देत आहे. हे शिक्षण म्हणजे नवसंजीवनी आहे.

## * सर्व शिक्षा अभियानाची उद्दिष्टे :-

- इ.स. 2007 पुर्वी सर्व मुलांना 5 वर्षाचे प्राथमीक शिक्षण पुर्ण करतील.
- इ.स. 2010 सर्व मुलांना 8 वर्षाचे प्राथमीक शिक्षण.
- 2010 पर्यंत मुलामुलींना शाळेत टिकून ठेवले पाहीजे.

## ध्येय :

- 2015 पर्यंत प्रौढ साक्षरतेत 50% पर्यंत वाढ करणे, विशेषत स्त्रीयांची आणि सर्व प्रौढासाठी मुलभूत आणि सातत्यपूर्ण असे शिक्षण उपलब्ध करून देणे.
- 2015 पर्यंत प्राथमीक आणि माध्यमीक शिक्षणातील लिंग भेद मिटवणे आणि शिक्षणात 2015 पर्यंत लिंग समानतेच ध्येय गाठणे मुलींना पुर्ण समान शिक्षण आणि मुलभूत चांगल्या दर्जाचे शिक्षण मिळेल याकडे लक्ष देणे.